महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२५/ प्रप्र/DSE/२०२५/१०७७/सूचना क्र.१ दिनांक : २७/०५/२०२५

# जाहिर सूचना क्रमांक - १

## राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षातील प्रवेश कार्यक्रम २०२५-२६

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या [B.Sc. (Agri)] थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश देण्याची प्रक्रिया दिनांक २८ मे, २०२५ पासून सुरु होत आहे. यासाठी प्रवेश पात्रता व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम | कालावधी | श्रेयांक भार | प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती |
|---|---|---|---|
| बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी) चे थेट द्वितीय वर्ष | ३ वर्षे (६ सत्रे) | १३८ | महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्रनिकेतन मधून ३ वर्षाचा, इंग्रजी माध्यमातील कृषी तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>३ वर्षाच्या इंग्रजी माध्यमातील कृषी तंत्रनिकेतन पदविकेमध्ये, खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० एकत्रित श्रेयांक सरासरी गुण (सी.जी.पी.ए.) सह उत्तीर्ण व आरक्षित प्रवर्गासाठी (अ.जा. / अ.ज. / वि.जा. / भ.ज. (ब) / भ.ज. (क) / भ.ज. (ड) / इमाव / विमाप्र / सा. व शै. मा. व. / आ.दु.घ. / दिव्यांग / अनाथ) किमान ५० एकत्रित श्रेयांक सरासरी गुण (सी.जी.पी.ए.) सह उत्तीर्ण. |

वरील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून राबविण्यात येत आहे. यासाठी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका वेबसाईटवर दिनांक २८ मे, २०२५ पासून उपलब्ध आहे. ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक ११ जून, २०२५ आहे.

**सही/-**
**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**